निशाणी क्र.४२

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एस.आर कुलकर्णी यांचे मार्फत सुरुः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – नागिन मोहन गायकवाड,

वय – ५० वर्षे, व्यवसाय–मजुरी,

राहणार – रा.कोराळी, ता.निलंगा, जि. लातूर

घटनेला आठवे वर्षे चालू आहे. घटना दुपाारी ११.०० वाजता कासारसिरसी रामलिंग मुदगड जाणाऱ्या रोडवर हत्तरगा मोडवर घडली. सकाळी १०.०० वाजता मी, वामन गायकवाड, व्यंकट गायकवाड व अनुसया गायकवाड असे आम्ही व्यंकट गायकवाड यांच्या ॲटोने मोगरगा येथे अंत्यविधीकरीता जात होतो. ॲटो व्यंकट गायकवाड चालवित होते. आमची गाडी डाव्या बाजुने जात असतांना त्यांची गाडी वेडीवाकडी आली व आमच्या गाडीला ठोकले. मी त्या गाडीचालकाला ओळखते. तो समोर बसलेला आहे. आम्हाला हातापयाला लागले. मला हाताला टाके पडलेले आहेत. अनुसयाला तोंडाला लागले होते. वामनचे दात पडले होते व व्यंकटचा हात फ्रॅक्चर झाला होता. आमच्या गाडीला धडक देणारा आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. डी.एस.बिराजदार यांच्यामार्फत शपथेवर सुरु –**

०२. आम्ही गाडीमध्ये एकुण चौघेजण होतो. ॲटोत आम्ही दोघी मागे बसलो होतो व वामन व्यंकटच्या बाजुला बसलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाचा रस्ता खड्डे पडलेला कच्चा रस्ता होता. घटना घडलेली तारीख मला सांगता येत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगते की, मला लिहता वाचता येत

नाही. ज्या गाडीने ठोकले त्याचा नंबर मला सांगता येत नाही. वळणावर गतिरोधक आहे का नाही हे मला माहीत नाही. वळणाच्या वेळी हात किंवा इंडिकेटर दाखवला होता असे काही घडले नाही. हे म्हणणे खरे नाही की, अंत्यविधीकरीता जायचे म्हणून अचानक गाडी वळवली. घटनेनंतर आम्ही दवाखान्यात गेलो. दवाखान्यात किती वाजता गेलो हे मला सांगता येत नाही. डॉक्टरांनी उपचार करुन निलंगा येथे पाठवले. दवाखान्यात मी पोलीसांना जबाब दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, अंत्यविधीकरीता उशीर होत असल्यामुळे हयगयीने व्यंकटने गाडी चालवल्यामुळे घटना घडली. हे म्हणणे खरे नाही की, व्यंकटला गाडी चालवता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.07.07 17:41:55 +0530

(**श्रीमती.के.पी.गाडे**)

दिनांक–०७/०७/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२), निलंगा